## नि.क्र. ४३ वरील आदेश

अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे अर्ज दुरुस्ती करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, प्रस्तुत कामातील जाबदार क्र.३ सतिश जयसिंग मोरे यांनी त्यांचे वडील जयसिंग बापू मोरे मयत असून त्यांना अर्जात नमूद वारस असल्याचे सांगितले. त्यामुळे ते आवश्यक पक्षकार असल्याचे समजून आले. त्यांना प्रस्तुत कामी आवश्यक पक्षकार करणे गरजेचे आहे. जाबदार क्र.१ मयत असल्यामुळे त्यांचे नांव वगळण्यात येऊन त्यांच्या नांवासमोर मयत अशी दुरुस्ती करणे तसेच विनंती कलमामध्ये अर्जदार व जाबदार नं. "१ ते ५" अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. जाबदारतर्फे नि.क्र.४४ वर म्हणणे देऊन अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांनी असे कथन केले की, प्रस्तुत अर्ज मुदतीत नाही. जाबदार क्र. १ यांना वारस आहेत याबाबत अर्जदार यांनी पुर्तता करणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर न घेता चुकीच्या पध्दतीने जाबदार क्र.१ चे नांव कमी करण्याची मागणी केली आहे. अर्जदार यांनी आवश्यक पक्षकारांबाबत अर्ज दाखल करतेवेळी पुर्तता करणे गरजेचे होते. परंतु ती न केल्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्जदार व जाबदारतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे जाबदार नं. ३ यांचे वडील मयत आहेत व त्यांना इतरही वारस आहेत असे नुकतेच समजून आल्याने तसेच ते आवश्यक पक्षकार आहेत. त्याचबरोबर जाबदार नं.१ यांचे नांवापुढे मयत अशी दुरुस्ती त्यांनी मागितली असून विनंती

पॅरामध्ये जाबदार नं.१ ते ५ अशीही दुरुस्ती मागितली आहे. जाबदार नं. ३ चे वडील जयसिंग महार यांचे अर्जात नमूद केलेप्रमाणे वारस असल्याचे जाबदारतर्फे नाकारण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांना अर्जाचे कामी सामील केलेस कोणाचेही नुकसान होणार नाही. उर्वरित दुरुस्ती पाहता ती देखील किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे ती मंजूर केल्यास जाबदारचे नुकसान होणार नाही. मात्र झालेल्या विलंबाचा विचार करता अर्जदार यांनी जाबदार यांना खर्च रक्कम रुपये ५००/- देऊन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्जदारांचा प्रस्तुतचा अर्ज त्यांनी जाबदार यांना खर्च र.रु.५००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदारांनी अर्जामध्ये मुदतीत दुरुस्ती करुन दुरुस्त अर्जाची प्रत दाखल करावी.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.08.20 17:47:27 +0530

(व्ही. ए. देसाई)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
शिराळा

शिराळा
दिनांक २०/०८/२०२५

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.S.Patil |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 20/08/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 21/08/2025 |
| Judgment uploaded on | : | 21/08/2025 |